मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# जगद्गुरु संत तुकाराम महाराज पालखीचे शहरात आगमन

## निगडीतील भक्ती-शक्ती चौकात महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्याकडून पालखीचे स्वागत

**पिंपरी | प्रतिनिधी**

हरीनामाचा जयघोष करित पंढरपूरच्या दिशेने निघालेल्या जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज आषाढीवारी पालखी सोहळ्याचे गुरूवारी (दि.१९) सायंकाळी पिंपरी चिंचवड शहरात आगमन झाले. या सोहळ्याचे स्वागत महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांनी केले. पालखीचा आजचा मुक्काम आकुर्डी येथील विठ्ठल मंदिरात असणार आहे. भक्ती शक्ती चौक मार्गे पालखी आकुर्डी येथील विठ्ठल मंदिराकडे मार्गस्थ झाली.



निगडी येथील भक्ती शक्ती चौकात झालेल्या या स्वागत सोहळ्याला अतिरिक्त आयुक्त अण्णा बोडदे, शहर अभियंता मकरंद निकम, शहर अभियंता प्रमोद ओंभासे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड आदींनी दिंडी प्रमुखांचा सत्कार केला.

यावर्षी दिंडी प्रमुखांना कापडी पिशवी, प्रथमोपचार पेटी, संपर्क क्रमांक असलेली माहिती पुस्तिका तसेच झाडांच्या बिया, पुष्पहार आणि श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. वृक्षारोपण, वृक्षदिंडी, हरीतवारी असे विविध उपक्रम देखील महापालिकेच्या वतीने राबविण्यात आले.

आषाढीवारीच्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या वतीने स्थापत्य, आरोग्य, स्वच्छता, पाणीपुरवठा, सुरक्षा व्यवस्थेबरोबरच यंदाची वारी पर्यावरणपूरक, प्लास्टिक मुक्त, हरितवारी करण्याच्या दृष्टीने नियोजन करण्यात आले होते. पिण्याच्या पाण्याचे व्यवस्थापन, पालखी मुक्काम, वारकरी निवास आणि पालखी मार्गावर पुरेशा प्रमाणात शौचालयांची व्यवस्था करण्यात आली. आकुर्डी येथील विठ्ठल रुख्मिणी मंदीरामध्ये जगद्गुरु संत तुकाराम महाराज पालखी मुक्कामासाठी विसावला आहे.

दिंड्यांच्या मुक्काम ज्या महापालिकेच्या शाळांमध्ये असतो तसेच इतर खाजगी ठिकाणी असतो तेथे महापालिकेच्या वतीने आवश्यक सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. पुरेसे शौचालय, स्नानगृह, पिण्याचे पाणी, वैद्यकीय सुविधा अशा आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करुन देताना प्रत्येक ठिकाणी स्वतंत्र समन्वयकाची नेमणूक करण्यात आली आहे. पालखी सोहळ्यासोबत पिण्याच्या पाण्याचे टँकर, रुग्णवाहिका तसेच अग्निशमन वाहनाची व्यवस्था करण्यात आली आहे.

---

# ज्ञानेश्वर माऊलींसाठी 1 किलो सोन्याचा मुकूट अर्पण

## मुकुटावर कमळ, चक्र, सूर्यकिरण आदी मंगल धार्मिक प्रतीकांची कलात्मक मांडणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

भाविकांकडून नेहमीच आपली श्रद्धा व्यक्त करताना श्रद्धास्थान असलेल्या देवस्थानी दान अर्पण केलं जातं. अनेकदा हे दान मौल्यवान वस्तूंच्या स्वरुपातही असतं. महाराष्ट्रातील विविध तिर्थक्षेत्राच्या ठिकाणी भाविकांकडून दर्शन घेत दान अर्पण केलं जातं. आळंदीची भक्ती, कला आणि तंत्रज्ञान यांचा अद्वितीय संगम असलेल्या एका अलंकारिक मुकुटाचं आळंदीतील श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या चरणी अर्पण करण्यात आलं.



नांदेड येथील भारत रामिनवार आणि मिरा रामिनवार या भक्तदांपत्यानं सुमारे १ कोटी रुपये किंमतीचा आणि १ किलो शुद्ध सोन्यापासून बनवलेला हा मुकुट “ज्ञानेश्वर महाराज संस्थान आळंदी” येथे अर्पण केला. या मुकुटाची निर्मिती सुप्रसिद्ध पु. ना. गाडगीळ आणि सन्स लि. यांनी केली असून, चार महिन्यांच्या अथक परिश्रमातून तो साकारला आहे. पारंपरिक नक्षीकाम, धार्मिक प्रतीकांची सूक्ष्म कोरीव रचना आणि आधुनिक 3D तंत्रज्ञानाचा सुंदर समन्वय यामध्ये पाहायला मिळतो.

या विशेष प्रसंगी योगी निरंजननाथ (प्रमुख विश्वस्त), डॉ. भावार्थ देखणे (विश्वस्त व पालखी सोहळा प्रमुख), ज्ञानेश्वर वीर (व्यवस्थापक) आणि ॲड. राजेंद्र उमाप (विश्वस्त ) हे मान्यवर उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीत माऊलींना हा अलंकार भक्तिपूर्वक अर्पण करण्यात आला.

हा मुकुट विशेष धार्मिक प्रसंगी माऊलींना परिधान करण्यात येणार असून, भाविकांसाठी तो श्रद्धा, भक्ती आणि अभिमानाचं प्रतीक ठरेल. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्यानं पारंपरिक श्रद्धेची अशी साजेशी मांडणी ही काळाशी सुसंगत अशी भक्तीची अभिव्यक्ती म्हणावी लागेल. रामिनवार दांपत्याच्या या अद्वितीय अर्पणामुळे संत ज्ञानेश्वर माऊलींच्या सेवेत जोडलेली ही कलाकृती भाविकांच्या मनात अढळ स्थान मिळवेल, यात शंका नाही.

### मुकुटावर कमळ, चक्र, सूर्यकिरण

» **मुकुटावर कमळ, चक्र, सूर्यकिरण आदी मंगल धार्मिक प्रतीकांची कलात्मक मांडणी करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, वारकरी परंपरेशी नातं असलेल्या कुशल कारागिरांनी हा मुकुट भक्तिभावाने घडवला असून, त्यामुळे त्याला अधिक पावित्र्य लाभले आहे.**

# पालखी सोहळ्यानिमित्त पुण्यातील वाहतुकीत बदल

## पालखी आगमनानिमित्त शुक्रवारी शहरातील प्रमुख रस्ते वाहतुकीस बंद ठेवण्यात येणार

**पुणे | प्रतिनिधी**

श्री संत ज्ञानेश्वर महाराज आणि श्री संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्याचे आगमन शुक्रवारी (२० जून) शहरात होणार आहे. पालखी आगमनानिमित्त शुक्रवारी शहरातील प्रमुख रस्ते वाहतुकीस बंद ठेवण्यात येणार आहे. वाहनचालकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी केले आहे. पालखी सोहळ्यानिमित्त शहरात कडक बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे, असे त्यांनी सांगितले.

पालखी सोहळ्यात भाविकांची होणारी गर्दी विचारात घेऊन वाहतूक पोलिसांनी बंदोबस्ताची आखणी केली आहे. पालखी सोहळ्याचे आगमनानिमित्त शहरातील वाहतूक व्यवस्थेत मोठे बदल करण्यात येणार आहे.

शहरात बाहेरगावाहून येणाऱ्या वाहनांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा. शुक्रवारी सकाळी आठ ते रात्री बारा वाजेपर्यंत रेंजहिल चौक ते संचेती चौक (गणेशखिंड रस्ता), डेक्कन जिमखाना येथील खंडोजीबाबा चौक ते वीर चापेकर चौक (नामदार गोपाळकृष्ण गोखले रस्ता – फर्ग्युसन रस्ता), गाडगीळ पुतळा चौक ते स. गो. बर्वे चौक (छत्रपती शिवाजी रस्ता), आपटे रस्ता, नामदार गोपाळकृष्ण गोखले रस्ता ते टिळक रस्ता, लक्ष्मी रस्ता (टिळक चौक ते संत कबीर चौक), शनिपार चौक ते सेवासदन चौक, नेहरू चौक ते सोन्या मारुती चौक, गणेश रस्त्यावरील देवजीबाबा चौक ते हमजेखान चौक, नेहरू रस्त्यावरील रामोशी गेट ते पालखी विठोबा मंदिर, संत कबीर चौक ते चाचा हलवाई चौक हे मार्ग वाहतुकीसाठी बंद राहणार आहे, अशी माहिती पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी पत्रकार परिषदेत दिली. या वेळी सहपोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा, गुन्हे शाखेचे अतिरिक्त आयुक्त पंकज देशमुख, वाहतूक शाखेचे उपायुक्त अमोल झेंडे, डॉ. संदीप भाजीभाकरे, तसेच पोलीस निरीक्षक (वाहतूक नियोजन) सुनील गवळी उपस्थित होते.



### पालखी मुक्कामी रस्ते बंद

» पालखी सोहळा मुक्कामी आल्यानंतर नाना-भवानी पेठेतील रस्ते वाहतुकीस बंद राहणार आहेत. पालखी सोहळा रविवारी (२२ जून) सकाळी शहरातून प्रस्थान ठेवणार आहे. वारकरी बांधव श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिर, तसेच शनिवार वाडा परिसरात गर्दी करत असल्याने शुक्रवारी (२० जून) ते रविवारी (२२ जून) सकाळी अकरापर्यंत छत्रपती शिवाजी रस्ता, लक्ष्मी रस्ता (संत कबीर चौक ते बेलबाग चौक) वाहतुकीस बंद ठेवण्यात येणार आहे. वाहनचालकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा.

### दृष्टीक्षेपात पालखी सोहळा बंदोबस्त

- » शहरात साडेसहा हजार पोलिसांचा बंदोबस्त तैनात
- » गर्दीचे नियंत्रण, नियोजनावर लक्ष केंद्रीत
- » सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची पालखी सोहळ्यावर नजर
- » दिंडीतील वाहनांना पुढे पाठविणार
- » भाविक, वारकऱ्यांच्या सुरक्षेला प्राधान्य
- » वाहतूक बदलांची माहिती https://diversion.punepolice.gov.in/ लिंकवर
- » शहरातील प्रमुख २६ रस्ते वाहतुकीस बंद
- » चोरी, गैरप्रकार रोखण्यासाठी स्वतंत्र बंदोबस्त
- » भाविकांना सूचना देण्यासाठी ध्वनिवर्धक यंत्रणा

# पालखी सोहळ्याच्या नियोजनासाठी महापालिकेत बैठकांची 'वारी'

## मंत्री, भाजप नेत्यांच्या बैठकांमुळे कार्यालयांमध्ये शुकशुकाट; नागरिकांना त्रास

**पिंपरी | प्रतिनिधी**

पंढरपूर येथे जाण्यासाठी संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांचा पालखी सोहळा शुक्रवारी (२० जून) पुणे शहरात मुक्कामी येणार आहे. यानिमित्त आवश्यक ती तयारी करण्यासाठी गेल्या काही दिवसांपासून सतत वेगवेगळ्या पातळ्यांवर अधिकारी आणि राजकीय नेत्यांनी बैठका घेण्याचे सत्र सुरू केल्याने महापालिकेतील कार्यालयांमध्ये शुकशुकाट असल्याचे चित्र दिसत आहे. अधिकारी जागेवर नसल्याने कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे.

दर वर्षी पालखी सोहळा पुणे मुक्कामी असताना आवश्यक ते नियोजन करण्यासाठी महापालिका प्रशासन, तसेच पोलीस विभाग यांच्यामध्ये बैठका होतात. मात्र, यंदा वारीच्या बैठकांच्या प्रमाणात मोठी वाढ झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. गेल्या आठ दिवसांमध्ये अपवादात्मक एखादा दिवस वगळला, तर दररोज वारीच्या नियोजनाच्या बैठका घेण्यात येत असल्याने महापालिका अधिकारीही हैराण आहेत.

वारीच्या नियोजनासाठी आयुक्त नवल किशोर राम यांनी दहा दिवसांपूर्वी अधिकाऱ्यांची बैठक घेऊन खबरदारी घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानंतर प्रत्येक दोन ते तीन दिवसांनी त्याचा आढावादेखील महापालिका प्रशासनाकडून घेतला जात आहे.

चार दिवसांपूर्वी पालकमंत्री आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त, पोलीस आयुक्तांसह इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांबरोबर बैठक घेतली. यामध्ये महापालिकेतील विविध विभागप्रमुख उपस्थित होते. या बैठकीत वारकऱ्यांना महापालिकेने पुरेशी शौचालये, पिण्याचे स्वच्छ पाणी पुरविण्याचे, रस्त्यांची डागडुजी करण्याचे आदेश देण्यात आले.

या बैठकीनंतर केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी मंगळवारी विश्रांतवाडी येथे जाऊन पालखी मार्गाचा पाहणी दौरा केला. त्यानंतर राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनीही वारीच्या नियोजनासाठी बैठकांचे आयोजन केल्याने राजशिष्टाचार म्हणून महापालिका अधिकाऱ्यांना त्या बैठकांत उपस्थित राहून वारीसाठी केलेल्या नियोजनाची माहिती द्यावी लागली.

भाजपच्या शहरातील नेत्यांसह पालखी मार्ग कसबा विधानसभा मतदारसंघातून जात असल्याने आमदार हेमंत रासने यांनीही अधिकाऱ्यांची बैठक घेत आवश्यक त्या सूचना केल्या. गेल्या काही दिवसांपासून शहरातील नेते वेगवेगळ्या वेळेत वारीची बैठक घेत असल्याने महापालिका अधिकारी त्रस्त झाले आहेत.

दरम्यान, पालखी दोन दिवसांत शहरात येत असल्याने बुधवारी पोलीस आणि महापालिका अधिकारी यांचीही एक बैठक महापालिकेत झाली. महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांनी ही बैठक घेतली. अडीच ते तीन तास बैठक सुरू होती. त्यामुळे अनेक विभागप्रमुख त्यांच्या कार्यालयात उपस्थित नसल्याने कामानिमित्त आलेल्या नागरिकांना ताटकळत बसावे लागले.



> दोन्ही पालख्या शुक्रवारी पुण्यात दाखल होत आहेत. यामध्ये काही अडचणी आल्यास महापालिका, पोलिसांचे नियोजन काय असेल, यावर चर्चा करण्यासाठी ही बैठक होती. महापालिकेची सर्व तयारी पूर्ण झाली आहे.
>
> **- ओमप्रकाश दिवटे, अतिरिक्त महापालिका आयुक्त, पुणे महापालिका.**

# पिंपरी-चिंचवड महापालिकेची ७६ हजार मालमत्ताधारकांकडे ५०० कोटींची थकबाकी

## महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाने कितीही जनजागृती केली, तरीही थकबाकी असलेले करदाते कर भरण्यास टाळाटाळ करत आहेत.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाने कितीही जनजागृती केली, तरीही थकबाकी असलेले करदाते कर भरण्यास टाळाटाळ करत आहेत. शहरातील ७६ हजार ६८८ मालमत्ताधारकांकडे तब्बल ४९८ कोटींची थकबाकी आहे. त्यामुळे या थकबाकीदार मालमत्ताधारकांना २०२५-२०२६ या आर्थिक वर्षांच्या बिलासोबतच जप्तीपूर्व नोटीस पाठवण्यात आली आहे.

पिंपरी-चिंचवड शहरातील करसंकलन विभागाकडील ६ लाख ३० हजार २९४ मालमत्ताधारकांपैकी गतवर्षी ५ लाख ०२ हजार ०२८ यांनी कर भरणा केला शहरातील निवासी, औद्योगिक, मोकळे भूखंड, मिश्र मालमत्ताचा महापालिकेने केलेल्या सर्वेक्षणात आढळलेल्या सुमारे ९२ हजार नवीन मालमत्तांची नोंदणी झाली आहे. या मालमत्तांकडून महापालिका कर वसूल सुरू आहे. नागरिकांना कर भरण्यासाठी ऑनलाइनसह रोखीने कर भरण्याची व्यवस्था करण्यात आली.




### कर संकलनासाठी नव्या कल्पना

**» यंदाच्या आर्थिक वर्षामध्ये कर संकलनामध्ये वृद्धी करण्यासाठी करसंकलन विभाग काही पुढाकार घेणार आहे. करवसूली मोहीम राबवण्यात येणार असल्याचे कर संकलन विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. थकबाकीदारांची संख्या शून्यावर आणण्यासाठी 'थकबाकीदारमुक्त महापालिका' अभियान राबवण्यात येणार आहे. पहिल्या तिमाहीपासूनच बिगरनिवासी, व्यावसायिक, औद्योगिक मालमत्तांवर जप्तीची धडक कारवाई सुरु होणार आहे. रहिवासी मालमत्ताधारकांना नळजोडणी खंडित करणार. सोसायट्यांमधील फ्लॅटचे पार्किंग क्रमांक सोसायट्यांकडून मागवण्यात येणार. सर्वप्रथम रहिवासी थकबाकीदारांच्या जंगम मालमत्तावर चारचाकी वाहने/दुचाकी वाहने जप्तीची कारवाई करण्यात येणार. मालमत्ता कराच्या बिलांवर थकबाकीदार असल्याचा उल्लेख असणार आहे.**

**"शहराच्या सर्वांगीण विकासासाठी पायाभूत सुविधा उभारणी, स्वच्छता, रस्ते, पाणीपुरवठा यांसारख्या क्षेत्रात महापालिका सातत्याने काम करत आहे. यासाठी आवश्यक निधीचा एक महत्त्वाचा स्रोत म्हणजे मालमत्ता कर. नागरिकांनी वेळेत कर भरून महापालिकेच्या विकास प्रक्रियेत सहभागी व्हावे. ३० जूनपूर्वी कर भरणाऱ्यांना दिली जाणारी सवलत ही नागरिकांसाठी एक उत्तम संधी आहे.**

**- प्रदीप जांभळे-पाटील, अतिरिक्त आयुक्त, महापालिका.**

२०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये मालमत्ताधारकांना कर भरण्यासाठी प्रवृत्त करण्यासाठी करसंकलन विभागाने विविध कार्यपद्धती अवलंबली. यामध्ये बिगरनिवासी, औद्योगिक व मिश्र मालमत्तांना जप्तीची कारवाई करण्यात आली. त्यातील ४३४ मालमत्ता अंतिम लिलावाच्या उंबरठ्यावर आहेत. त्यांचा जून २०२५ मध्ये लिलाव करण्यात येणार आहे. शहरातील थकबाकी रहिवासी मालमत्तांचे नळजोडणी खंडित केली. सातबाऱ्यावर बोजा चढवण्याची कारवाई केली. सदनिकाधारकांच्या शेअर सर्टिफिकेटवर थकीत रकमेचा बोजादेखील चढवण्यात आला. थकीत बिगरनिवासी, व्यावसायिक, औद्योगिक, मिश्र मालमत्तांच्या एकूण १०७२ मालमत्तांवर जप्ती करण्यात आली.

नागरिकांनी महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावरून किंवा मोबाईल ॲपद्वारे ऑनलाइन कर भरल्यास, सामान्य करात १० टक्के, महिलांच्या नावावर नोंद असलेल्या मालमत्तांवर ३० टक्क्यांपर्यंत करसवलत दिली जात आहे. महापालिकेने पर्यावरणपूरक उपक्रम राबवणाऱ्या गृहनिर्माण संस्था, दिव्यांग व्यक्तींच्या नावावर असलेल्या मालमत्ता, तसेच महिलांच्या नावावर असलेल्या मालमत्तांना सामान्य करात सवलत देण्याचे धोरण स्वीकारले आहे. ऑनलाइन कर भरण्यास नागरिकांचा प्रतिसाद मिळत असून आतापर्यंत ऑनलाईन माध्यमातून १ लाख ८९ हजार ८२३ नागरिकांनी १० टक्के सवलतीचा लाभ घेतला आहे. केवळ ऑनलाईन व्यवहारांमधूनच १८९ कोटी ५२ लाख रुपये जमा झाले आहेत.

# पिंपंरी चिंचवड शहराचे नाव "जिजाऊ नगर" करा

## भक्ती शक्ती प्रतिष्ठानच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे प्रत्यक्ष भेटून पत्राद्वारे केली आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहर औद्योगिक नगरी म्हणून ओळखली जाते. परंतु या शहराला या राजमाता जिजाऊ यांच्या संस्काराची, अस्मितेची चिरंतन असणारी ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. छत्रपती शिवराय यांच्यामध्ये स्वराज्याचे प्रेरणा राजमाता जिजाऊ यांनी जागविले. जिजाऊंना म्हणजेच मातृशक्तीला मानाचा मुजरा करून पिंपरी चिंचवड शहराचे नाव "जिजाऊ नगर" करावे अशी मागणी भक्ती शक्ती प्रतिष्ठानच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मंगळवारी (दि.१७) प्रत्यक्ष भेटून पत्राद्वारे केली आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांना दिलेल्या पत्रात भक्ती-शक्ती प्रतिष्ठाणचे अध्यक्ष महेश बारणे यांनी म्हटले आहे की, पिंपरी चिंचवड शहराचे नाव "जिजाऊ नगर" करण्यात यावे. ही केवळ नामांतरणाची मागणी नाही. हा महाराष्ट्राच्या मातृशक्तीला मानाचा मुजरा आहे. ही राजमाता जिजाऊ यांची स्मृती, अभिमानाची साक्ष आहे. जिजाऊंच्या स्वाभिमानी विचारांपुढे नतमस्तक होऊन त्यांचा गौरव होण्याची हीच योग्य वेळ आहे. अशी या भूमीतल्या सर्वांची सार्वत्रिक भावना आहे.

स्वराज्य ही केवळ एक राजकीय संकल्पना नव्हती तर ती एक चेतना होती. धगधगतं स्वप्न आणि जळजळीत स्फुल्लिंग होतं. हे स्वप्न ज्या मनगटांनी प्रत्यक्षात आणलं ते छत्रपती शिवराय, पण शिवरायांच्या मनगटाआधी ज्या मायेच्या काळजावर ते सर्वप्रथम उमटलं... त्या होत्या माँसाहेब जिजाऊ !शिवरायांच्या शौर्यात जितकं तलवारीचं योगदान, तितकंच मोलाचं बळ त्यांच्या माऊलीच्या संस्कारांचेही आहे. म्हणूनच




### भक्ती-शक्ती प्रतिष्ठानची मुख्यमंत्र्यांकडे मागणी...

**» आपला जाज्वल्य भूतकाळ आपण का विसरायचा? ज्या मायेनं 'शिवबा' घडविले, त्या नावाने हे शहर घडवायला आपण मुख्यमंत्री म्हणून लवकरात लवकर निर्णय घ्यावा. साडेतीनशे वर्षांच्या या इतिहासात माँसाहेब जिजाऊंनी दिलेला वारसा आजही आपल्या धमन्यांतून वाहतोय. पण आपण त्यांच्या नावाचा, त्यांच्या त्यागाचा, त्यांच्या मायेच्या सामर्थ्याचा सन्मान केला पाहिजे. भक्ती शक्ती प्रतिष्ठानच्या वतीने आणि सर्व शहरवासीयांचे वतीने पिंपरी-चिंचवड हे नाव बदलून 'जिजाऊ नगर' असे नाव करावे. अशीही मागणी त्यांनी पत्राद्वारे केली आहे.**

ज्या भूमीवर त्या माऊलीची पावलं पडली, जिथे स्वराज्याचा पहिला श्वास घेतला गेला, ती भूमी केवळ "औद्योगिक नगरी" म्हणून नव्हे, तर "ऐतिहासिक" म्हणून ओळखली गेली पाहिजे.

आपण ज्या शहराचा उल्लेख करताना सर्रास पीसीएमसी किंवा पिंपरी-चिंचवड म्हणतो, ते नाव ही कालौघात आलेले आहे. काही छोट्या गावांच्या एकत्रीकरणातून जन्मलेलं हे शहर, औद्योगिकीकरणाच्या लाटेत प्रचंड वेगाने वाढलं. परंतु या नावाला काही ऐतिहासिक ठसा नाही, काही आदर्शात्मक प्रेरणा नाही. निर्जीव इंग्रजी उल्लेख होणं इतकंच या ऐतिहासिक भूमीच्या नशिबी आलं. अशी मागणी भक्ती शक्ती प्रतिष्ठानच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे प्रत्यक्ष भेटून पत्राद्वारे केली आहे.

# ऐतिहासिक होळकर वाडा कोसळणार!

## वाडा आणि वाड्याभोवती नव्याने होत असलेल्या बांधकामामुळे जेजुरी येथील ऐतिहासिक वास्तू होळकर वाडा उद्ध्वस्त होण्याच्या मार्गांवर आहे

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जेजुरी येथील 265 वर्षांपूर्वीचा वाडा आणि वाड्याभोवती नव्याने होत असलेल्या बांधकामामुळे जेजुरी येथील ऐतिहासिक वास्तू होळकर वाडा उद्ध्वस्त होण्याच्या मार्गांवर आहे. वाड्याच्या वापरात असलेल्या इमारतीच्या भिंतींना आंतरभागात भेगा पडून व तडे जाऊन वाडा कोणत्याही क्षणी कोसळण्याच्या मार्गांवर आहे. वेळीच लक्ष न दिल्यास आणि नवीन बांधकाम न थांबविल्यास एक उत्तम बांधकाम शैलीचे होळकर घराण्याची ऐतिहासिक वास्तू नष्ट होईल. याबाबत स्थानिक नगरपलिका प्रशासन आणि पोलीस प्रशासनास निवेदन दिले असून संपूर्ण धनगर समाज रस्त्यावर उतरेल असा इशारा खासगी देवी अहिल्याबाई होळकर चॅरिटी ट्रस्टच्या वतीने देण्यात आला आहे.

अहिल्यादेवी होळकर सुभेदार तुकोजी होळकर यांनी सन 1745 ते 1765 दरम्यान कुलदैवत खंडोबा गडाची तटबंदी, बालद्वारी, नगारखाना आदी बांधकामे केली. त्याचबरोबर 1768 दरम्यान स्वराज्याचे पंतप्रधान पेशवे यांचे परवानगीने खोमणे-पाटील यांच्याकडून वाडा बांधकामासाठी जागा घेऊन होळकर वाड्याची निर्मिती केली होती. या वाड्याचा आजतागत लोकसेवा म्हणून उपयोग झाला. पुरातन काळापासून गोरगरीब परिवारातील लग्नकार्ये याच वाड्यात पार पडली आहेत. 1991ते 2010या वाड्यात आचार्य अत्रे प्रतिष्ठानचे महाविद्यालय चालवले जात होते त्यानंतर चिंचेच्या बागेत विद्यालय स्थलांतरित झाले आणि वाड्याकडे दुर्लक्ष झाले.



### ...परंतु ते ही निष्फळ ठरले

» मध्यंतरीच्या काळात होळकर घराण्याचे वंशजांनी दुर्लक्ष केल्याने वाडा काही काळ बंद होता पुन्हा चांदवड ट्रस्ट अंतर्गत होळकर वाडा ट्रस्टची निर्मिती करून भक्ती निवास म्हणून वापरात आणला गेला; परंतु आर्थिक मिळकत आणि देखभाल व्यस्थापन करणे जिकरीचे होऊ लागल्याने वाडा सांभाळणे कठीण होत असल्याचे जेजुरी होळकर ट्रस्ट अध्यक्ष अंकुश भांड आणि कमिटी ट्रस्ट आणि डागडुजी दुरुस्ती करिता समाजाबांधवांच्या मदतीने प्रयत्न केले परंतु ते ही निष्फळ ठरले.याबाबत होळकर घराण्याचे 16वे वंशज युवराज यशवंतराव होळकर यांनी अनेकदा वाड्याला भेटी दिल्या होत्या.

### जागा अखेर लुटल्या तरी कुणी?

» राजमाता देवी अहिल्याबाई होळकर यांनी जेजुरी परिसरात भविक यात्रेकरू करिता निवास, जलव्यवस्था चिंचबाग निर्मिती सारखे भव्तिव्य दृष्टीकोनातून लोकहिताचे कार्य केले आज मात्र तुळशीपत्र ठेवलेल्या होळकर घराण्यांच्या जागा अखेर लुटल्या तरी कुणी? असा सवाल समाजबांधव करत आहेत.

“ जेजुरी नगरीतील ऐतिहासिक वाडा अद्याप ही होळकरशाही आणि त्यांच्या इतिहासाची साक्ष देत उभा आहे; परंतु कोणत्याही क्षणी कोसळण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

- कैलास शिंगणे, व्यवस्थापक

अहिल्यादेवी होळकर, सुभेदार मल्हारराव होळकर यांच्या लोकांभिमुख कार्याची साक्ष देणारी भविक यात्रेकरू ना कुलधर्म कुलाचार करिता वाडा चिंचेची बाग. होळकर तलाव यांची निर्मिती केली याची साक्ष असलेले मल्हार गौतमेश्वर स्मृती छत्री मंदिर अदयापही साक्ष देत उभे आहे महाराजा होळकर ट्रस्टच्या ऐतिहासिक जागांची खरेदी विक्री दृश्य अदृश्य प्रमाणात झाल्यामुळे अनेक जागेवर नवीन वहीवाटी दारानी बांधकामे ही केली आहेत परंतु हा वाडा मात्र काही काळाचा सोबती असून वेळीस लक्ष न दिल्यास एक महत्वपूर्ण ऐतिहासिक वास्तू नष्ट होण्याची भीती होळकर इतिहास संशोधक अभ्यासक रामभाऊ लांडे यांनी व्यक्त केली आहे. तमाम देशभरातील धनगर समाज मोठे आंदोलनही करण्या करिता रस्त्यावर उतरेल असे देवी अहिल्या होळकर ट्रस्टने दिलेल्या निवेदनात म्हंटले असून याबाबत वाड्या लगतचे बांधकाम त्वरित थांबविणे या संबंधित निवेदन मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांनाही देण्यात आले आहे.

# रामदरा पूल मोजतोय शेवटची घटका, प्रशासनाचे दुर्लक्ष

## नागरिक, पर्यटक आणि भाविक या पुलावरून ये-जा करतात. त्यामुळे कुंडमळा अपघाताची पुनरावृत्ती होण्याची शक्यता नाकारता येत नाही, असा इशारा स्थानिक नागरिकांनी दिला

**पुणे | प्रतिनिधी**

लोणी काळभोर ग्रामपंचायत हद्दीतील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र रामदरा येथे जाणारा व 1965 साली बांधलेला नवीन मुठा उजवा कालव्यावरील पूल आता पूर्णतः जीर्ण झाला असून, कोसळण्याच्या उंबरठ्यावर आहे. दररोज सुमारे पाच हजार नागरिक, पर्यटक आणि भाविक या पुलावरून ये-जा करतात. त्यामुळे कुंडमळा अपघाताची पुनरावृत्ती होण्याची शक्यता नाकारता येत नाही, असा इशारा स्थानिक नागरिकांनी दिला आहे.

पावसाळा सुरू झाल्यानंतर रामदरा परिसर हिरवागार झाला आहे. पुणे आणि आजूबाजूच्या परिसरातून हजारो भाविक, ट्रेकर्स आणि पर्यटक येथे गर्दी करत आहेत. धार्मिक महत्त्वाबरोबरच निसर्ग पर्यटनाचे केंद्र म्हणूनही रामदरा ओळखले जाते. कोरोना नंतर पर्यटन वाढले असतानाही या ठिकाणी आवश्यक त्या पायाभूत सुविधा नाहीत.

सध्या पुणे महानगरपालिकेच्या पीएमपीएमएलच्या वतीने येथे बससेवा सुरू करण्यात आली आहे. एखादी बस घेऊन जर हा कुमकुवत पुल पडला तर प्रचंड जिवीतहानी होण्याची शक्यता आहे. फुरसुंगी रेल्वे स्थानकावर सुरू झालेल्या मालधक्क्या वरुन 25 – 30 टन माल वाहतूक करणा-या हायवा, डंपर गाड्या ही याच पूलावरून जातात. मात्र जलसंपदा विभाग अजूनही या पुलाच्या दुरुस्ती संदर्भात निर्णय घेत नाही. स्थानिकांनी जलसंपदा विभागाकडे वेळोवेळी निवेदने दिली आहेत, मात्र अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही.

लोखंडी कठडे गंजलेले, पूल एकाच मार्गाने जाणारा, पर्याय उपलब्ध नाही. त्यामुळे दुचाकी, चारचाकीच नव्हे तर पायी चालणाऱ्या नागरिकांनाही धोका निर्माण झाला आहे. कुंडमळा (ता. मावळ) येथे 35 वर्ष जुन्या पुलाच्या अपघातात अनेक निष्पाप जीव गेले. त्याच धर्तीवर रामदरा परिसरातील पूल कधीही कोसळू शकतो. पुण्यातील नाथ हरी पुरंदरे विद्यालयाच्या बस अपघाताची आठवण करून देत नागरिक म्हणतात, दुर्घटना घडल्याशिवाय हे प्रशासन जागे होणार नाही काय? स्थानिक नागरिक, भाविक, पर्यटक आणि सामाजिक संस्थांकडून तत्काळ नवीन पूल बांधण्याची मागणी जोर धरत आहे.



### 60 वर्ष जुना पूल

» नवीन मुठा उजवा कालवा हा हवेली, दौंड आणि इंदापूर तालुक्यांतील 66 हजार हेक्टर शेतीला पाणी पुरवतो. या कालव्यावर असलेला पूल आता पूर्णतः कमकुवत झाला असून त्याचे संरचनात्मक बांधकाम ढासळले आहे. अवजड वाहने, पीएमपी बस, ट्रक, डंपर यांचा रोजचा ओघ यामुळे पूल अक्षरशः हलत असल्याचे दृश्य पाहायला मिळते.

### भाविक, पर्यटक ,स्थानिकांचा एकमेव मार्ग

» दररोज सुमारे पाच हजार नागरिक, पर्यटक आणि भाविक या पुलावरून ये-जा करतात. कोळपे वस्ती, केसकर वस्ती, ढेले वस्ती, फुरसुंगी रेल्वे स्थानक अशा अनेक भागातील नागरिक आणि हजारो पर्यटक रामदरा शिवालयात जाण्यासाठी याच पुलावर अवलंबून आहेत. एका बाजूला धोकादायक पूल, तर दुसरीकडे गर्दी आणि वाहतुकीचा ओघ, ही विसंगती प्रशासनाच्या निष्काळजीपणाची साक्ष देते.